# डॉ.जे.जे.मगदूम फार्मसी कॉलेजमध्ये जागतिक फार्मासिस्ट दिन आणि राष्ट्रीय फार्माकोव्हिजिलन्स सप्ताह उत्साहात साजरा




**जयसिंगपूर (प्रतिनिधी)**:

जागतिक फार्मासिस्ट दिन दरवर्षी २५ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. तसेच, १७ ते २३ सप्टेंबर दरम्यान राष्ट्रीय फार्माकोव्हिजिलन्स सप्ताह साजरा केला जातो, ज्याचा उद्देश जागतिक आरोग्य सेवा सुधारण्यात फार्मासिटच्या महत्त्वपूर्ण भूमिकेबद्दल जागरूकता निर्माण करणे व औषधांच्या सुरक्षित वापराकरिता जागरूकता वाढवणे आहे. डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेज, जयसिंगपूर आणि इंडियन फार्मास्युटिकल असोसिएशन कोल्हापूर लोकल ब्रांच यांच्यातर्फे जागतिक फार्मासिस्ट दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात सुमारे ५०० विद्यार्थी आणि नोंदणीकृत फार्मासिस्ट यांच्या सहभागाने काढण्यात आलेल्या फार्मासिस्ट रॅलीने झाली. फार्माकोव्हिजिलन्स सप्ताह निमित्ताने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उदगाव याठिकाणी प्रबोधनपर पथनाट्य सादरीकरण केले. तसेच महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय पातळीवर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये मॉडेल मेकिंग, ओरल प्रेझेंटेशन, टेड टॉक, ॲड मॅड शो आणि रील मेकिंग यांचा समावेश होता. या स्पर्धेमध्ये बहुसंख्य फार्मसी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धांच्या बक्षीस वितरण समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. जे. जे. मगदूम होमिओपॅथीक मेडिकल कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुरेश नायर व कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शितलकुमार पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी सर्वांना फार्मासिस्ट दिनाचे महत्त्व समजावून सांगितले तसेच जगातील भारताचे फार्मसी क्षेत्रातील योगदान पटवून दिले. सर्व विजेत्यांना बक्षीस रक्कम, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाला डॉ. जे. जे. मगदूम ट्रस्टचे चेअरमन डॉ. विजय मगदूम, वाईस चेअर पर्सन ॲड. डॉ. सोनाली मगदम यांनी जागतिक फार्मसी दिनाच्या कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कॉलेजमधील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थींनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे नियोजन प्रा. स्नेहल पाटील आणि प्रा. अनुजा खिचडे यांनी केले.